'उप आयुक्त' पदावर दि.०१/०१/२०२३
रोजी काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची
अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीबाबत...

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी -४११ ०१८**
**क्र.सा.प्र.वि/१२/कावि/ 934 /२०२३**
**दिनांक : 98 /12 /२०२३**

वाचले क्र.
१) आदेश क्र.साप्रवि/१२/कावि/३२८/२०२३ दि.२५/०४/२०२३ अन्वये प्रसिध्द केलेली 'उप आयुक्त' पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांची दि.०१/०१/२०२३ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी
२) श्रीम.दुरगुडे आशादेवी यांचे आक्षेप अर्ज
३) मा.आयुक्त सो. यांचेकडील दि.२५/०९/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव
४) अधिकार प्रदान आदेश क्र.प्रशा/०२/कावि/५४५/२०२० दि. २७/१०/२०२०
५) सामान्य प्रशासन विभागाकडील दि. 98/12/ २०२३ चा मान्य प्रस्ताव

**आदेश**

सामान्य प्रशासन विभाग, महाराष्ट्र शासन राजपत्र क्र. एसआरव्ही-२०१६/प्र.क्र.२८१, मंत्रालय,मुंबई ४०००३२ दिनांक २१/०६/२०२१ अन्वये दि.०१/०१/२०२२ रोजी **'उप आयुक्त'** या पदावर नियमित पदोन्नती, सरळसेवा वा अन्य विहित मार्गाने नियुक्त अधिकाऱ्यांची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये प्रसिध्द करण्यात आली आहे. सदरच्या तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी मधील अधिकाऱ्यांचे नावाबाबत, जात, प्रवर्ग, जन्मतारीख, शैक्षणिक अर्हता, रुजू तारीख, ज्येष्ठता क्रम, नियुक्तीचा मार्ग, सेवानिवृत्ती दिनांक अथवा यादीमध्ये नांव नसलेबाबत हरकती काही आक्षेप असल्यास त्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी आपला आक्षेप लेखी निवेदन सादर करून ही तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाचे आत संबंधित शाखाप्रमुखांमार्फत योग्य त्या पुराव्यासह सादर करणेबाबत कळविणेत आलेले होते.

**'उप आयुक्त'** पदाची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी संबंधित अधिकाऱ्यांना बजाविलेबाबत सर्व संबंधित शाखाप्रमुखांकडून अहवाल प्राप्त झालेला नाही. शाखाप्रमुखांनी मुदतीत आक्षेप प्रशासन विभागाकडे सादर न केल्याने अंतिम सेवाज्येष्ठतायादी प्रसिध्दीनंतर काही वाद निर्माण झाल्यास याबाबतची संपुर्ण जबाबदारी शाखाप्रमुखांची राहील. प्रस्तुत तात्पुरती सेवाज्येष्ठतायादीवर **एक** आक्षेप प्राप्त झालेला आहे.

**शैक्षणिक अर्हतेमध्ये दुरुस्तीबाबत -**

श्रीम. दुरगुडे आशादेवी यांनी सेवाज्येष्ठतायादी मध्ये शैक्षणिक अर्हता एम.ए ऐवजी एम.ए (समाजशास्त्र) अशी दुरुस्ती करणेबाबत सादर केलेला आक्षेप व पदवी प्रमाणपत्र इत्यादी कागदपत्रे पाहून आक्षेप मान्य करण्यात आला आहे. तरी उपरोक्त मान्य आक्षेपाची यथार्थ नोंद अंतिम सेवाज्येष्ठतायादी मध्ये घेण्यात येत आहे.

सबब उपरोक्त वाचले क्रमांक ४ चे प्राप्त अधिकारान्वये **'उप आयुक्त'** पदाची दि.०१/०१/२०२३ रोजीची तात्पुरती सेवाज्येष्ठतायादी या आदेशान्वये महाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन) नियमावली २०२१ नुसार अंतिम स्वरुपात प्रसिध्द करण्यात येत आहे. ही अंतिम सेवाज्येष्ठतायादी मे.न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेवरील निर्णयामुळे पुर्वीची अथवा या सेवाज्येष्ठतायादीत बदल करावा लागेल, त्या निर्णयाच्या अधिन राहुन असेल.

(विजय खोराटे)
अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८

D:\drive E\sevajestata\2023\वर्ग 1\०१ उप आयुक्त\प्राथ.अंतिम आदेश वर्ग ३.doc1

प्रत:- संबंधित विभाग

२/- सदर आदेश व सेवाज्येष्ठतायादी मनपाच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आली असून सदरची प्रत संबंधित अधिकाऱ्यांचे निदर्शनास आणुन द्यावी.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -४११०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी 411 018

उप आयुक्त पदाची दि.01/01/2023 रोजीची अंतिम सेवाज्येष्ठतायादी

पे लेवल :- S-23 वेतनश्रेणी :- 67700 - 208700

| अ.क्र. | संगणक क्रमांक | अधिकाऱ्याचे नाव | प्रवर्ग | शैक्षणिक पात्रता | जन्म दिनांक | उप आयुक्त पदावरील रुजू दिनांक | नियुक्तीचा मार्ग (पदोन्नती/ सरळसेवा) | मनपामध्ये कामास लागलेचे | | सेवानिवृत्ती दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | पद | तारीख | | |
| 1 | 521 | दुरगुडे आशादेवी मारुती | अनुसुचीत जमाती | एम.ए.(समाजशास्त्र), बी.ए., एल.एस.जी.डी., एल.जी.एस., डी.एल.जी.एफ.एम, ऑफिस ॲटोमेशन कोर्स | 10/03/1965 | 12/10/2020 | पदोन्नती | लिपिक | 06/08/1983 | 31/03/2023 | सह आयुक्त पदावर पदोन्नती सेवानिवृत्त |
| 2 | 5048 | इंदलकर चंद्रकांत पोपट | खुला | बी.कॉम., एल.एल.बी., एल.एस.जी.डी., आय.टी.आय. (वायरलेस ऑपरेटर), एम.ए. (समाजशास्त्र), वृत्तपत्र विद्या पदविका, एम.एस.सी.आय.टी. | 01/06/1967 | 12/10/2020 | पदोन्नती | वायरलेस ऑपरेटर | 20/09/1988 | 31/05/2025 | |
| 3 | 8133 | लोणकर मनोज नंदकुमार | इतर मागास वर्ग | बी.ए., डिप्लोमा इन मेक.ॲण्ड ऑटोमोबाईल इं., एम.एस.सी.आय.टी., एल.एस.जी.डी. | 21/07/1974 | 12/10/2020 | पदोन्नती | लिपिक | 14/07/2000 | 31/07/2032 | |
| 4 | 10767 | खोत संदीप दादासाहेब | भटक्या जमाती (क) | बी.एस्सी. (ॲग्री), एम.एस.सी.आय.टी. | 01/08/1980 | 12/10/2020 | पदोन्नती | प्रशासन अधिकारी | 11/12/2013 | 31/07/2038 | |

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त, सामान्य प्रशासन
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018

(विजय खोराटे)
अतिरिक्त आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी 411 018